**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ९८/२०१९** | **दिनांक ०६/१२/२०१९** | **कालावधी ५ दिवस**


| | | |
|---|---|---|
| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ३०/११/२०१९ ते ०६/१२/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ०७/१२/२०१९ सकाळी ८:३० पासून ११/१२/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३०/११ | ०१/१२ | ०२/१२ | ०३/१२ | ०४/१२ | ०५/१२ | ०६/१२ | | ०७/१२ | ०८/१२ | ०९/१२ | १०/१२ | ११/१२ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३३.५ | ३३.१ | ३३.२ | ३३.० | ३१.० | ३०.० | ३१.० | कमाल तापमान (अं.से) | ३४ | ३४ | ३५ | ३४ | ३३ |
| २०.५ | २०.० | २०.५ | २३.० | २२.० | २३.५ | १९.५ | किमान तापमान (अं.से) | २३ | २३ | २४ | २४ | २३ |
| ० | २ | २ | ६ | २ | ६ | २ | मेघाच्छादन (ऑक्टा) | २ | २ | ७ | ४ | २ |
| ८७ | ८४ | ९३ | ८८ | ९१ | ९१ | ८९ | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ७० | ६९ | ७७ | ७४ | ७० |
| ५५ | ५५ | ५५ | ६० | ६३ | ५९ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ४७ | ४५ | ४९ | ४९ | ४३ |
| १.९ | २.२ | २.५ | ३.३ | ४.१ | २.९ | १.८ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ९ | ८ | ६ | ६ | ६ |
| शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | वाऱ्याची दिशा | पू. | पू. | पू. | पू. | पू. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ५१३०.९ | ३०७१.८ |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक ७ ते ११ डिसेंबर, २०१९ दरम्यान तापमानात वाढ संभवत असून दिनांक ९ ते १० डिसेंबर, २०१९ दरम्यान ढगाळ वातावरण राहील. दिनांक ६ ते १२ डिसेंबर, २०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा जास्त राहील. सामान्य फरक वनस्पती निर्देशांक (NDVI) नुसार रत्नागिरी जिल्ह्यामध्ये वनस्पती निर्देशांक चांगल्या स्वरूपाचा असून प्रमाणित पर्जन्यमान निर्देशांक (SPI) नुसार सौम्य ओलावा स्थिती दर्शविण्यात आली आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **आंबा** | **पालवी ते मोहोर अवस्था** | • पालवी अवस्थेत असलेल्या आंबा पिकावर तुडतुड्यांचा तसेच करपा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी डेल्टामेथ्रीन २.८% प्रवाही १० मि.ली. अधिक संयुक्त बुरशीनाशक (कार्बेन्डॅझिम १२% + मन्कोझेब ६३%) १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच मोहोर अवस्थेत असलेल्या आंबा पिकावर तुडतुड्यांचा व भुरी रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी डेल्टामेथ्रीन २.८% प्रवाही १० मि.ली. + हेक्झाकोनाझोल ५% प्रवाही ५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **काजू** | **मोहोर** | • मोहोर अवस्थेत असलेल्या काजू पिकावर ढेकण्या व फुलकिडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. किड मोहोरातील व नवीन पालवीतील रस शोषून घेते त्यामुळे मोहोर सुकून जातो. असून किडीच्या प्रादुर्भावामुळे मोहोराचे ढेकण्या व फुलकिडीपासून संरक्षण करण्यासाठी मोहोर फुटण्याच्या वेळी प्रोफेनोफॉस ५० टक्के प्रवाही १० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **नारळ** | **-** | • नवीन लागवड केलेल्या नारळ बागेत तीन ते चार वर्षे वयापर्यंतच्या माडाना ६ ते ७ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच पूर्ण वाढलेल्या माडांना जमिनीच्या मगदुराप्रमाणे ५ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. आळ्यामध्ये ओलावा टिकविण्यासाठी नारळाच्या शेंडया पुराव्यात आणि झावळ्यांचे आच्छादन करावे. |
| **कलिंगड** | **वाढीची अवस्था** | • कलिंगड पिकावर तुडतुडे व मावा किडींचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी तसेच पिकामध्ये पिवळ्या चिकट कागदाच्या सापळ्याचा वापर करावा. |
| **वांगी/मिरची/ टोमटो** | **वाढीची अवस्था** | • वांगी, मिरची आणि टोमेटो पिकामध्ये तुडतुडे, पांढरी माशी व मावा किडी पानांच्या खालच्या भागावर राहून पानांतील अन्नरस शोषून घेतात व त्यामुळे पाने पिवळी होतात. किडींचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी तसेच पिकामध्ये पिवळ्या चिकट कागदाच्या सापळ्याचा वापर करावा. |
| **कोबी** | **पुर्नलागवड** | • कोबी पिकाची रोपे लागवडीयोग्य झाली असल्यास पुर्नलागवड करावी. लागवड सरीवरंब्यावर ४५ x ४५ से.मी. किंवा ६० x ६० से.मी. अंतरावर करावी. लागवडीच्या वेळेस प्रति एकरी ८ टन शेणखत, ३५ किलो युरिया, १५० किलो सिंगल सुपर फोस्फेट आणि ४० किलो म्युरेट ऑफ पोटश खताची मात्र द्यावी. लागवडीनंतर लगेच पाणी द्यावे. |
| **दुभती जनावरे/शेळ्या** | **-** | • जनावरांवर गोचीडांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी गोठयाची स्वच्छता राखावी व पशुवैद्यकाच्या मार्गदर्शनाखाली डेल्टामेथ्रीन २ मि.ली. प्रति लिटर पाण्यामध्ये मिसळून संपूर्ण अंगावर द्रावण फवारावे. जनावरे औषध चाटणार नाही, याकरिता फवारणी पूर्वी जनावराला पाणी पाजावे. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**